दलित कोण? एक जागतिक शोध

चन्द्रशेखर पुरन्दरे

कोणत्याही समाजाच्या मुख्य प्रवाहांच्या किंवा बहुसंख्यांकांच्या अस्मितेपेक्षा निराळी अस्मिता असणारे समूह जगभरात आहेत. त्यांना समाजाच्या परिघावरच ठेवण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न बहुसंख्यांक, त्यांचे सरकार, त्यांनी निर्माण केलेली सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक व्यवस्था करतात. जात हे भारतीय वैशिष्ट्य आहे अशी आपली धारणा आहे. तिचे प्रमुख गणक म्हणजे सामाजिक बहिष्कृतता, पण जेथे जातीव्यवस्था अस्तित्वात नाही, अशा ठिकाणीही ही बहिष्कृतता जगभर आढळते. 'जन्म म्हणजे नियती' अशी जातीची व्याख्या या लेखासाठी करू. भारतीय संदर्भात तुम्ही कोणत्या जातीत जन्माला आलात, त्यावर तुमचे भवितव्य बहुतांशी ठरते. याच धर्तीवर भारताबाहेर वर्ण (कातीचा रंग या अर्थी, 'वर्ण'व्यवस्थेतील वर्ण या अर्थी नव्हे), वंश, तद्नुषंगिक भाषा-जीवनपद्धती-थोडक्यात संस्कृती-तुमचे भवितव्य ठरवते. तेथेही 'जन्म म्हणजे नियती' होते.

आपल्याकडे जसा 'खालची' जात आणि 'खालचा' वर्ग यांचा मिलाप झालेला दिसतो, तसाच इतरत्रही आढळतो. त्या-त्या समाजात बहुधा अल्पसंख्यांक असणारे हे समूह आर्थिकदृष्ट्याही दुबळे असतात. मानवी हक्क दूरच, त्यांना उपजीविकेचीही भ्रांत असतो. माझ्या मते, स्त्री-पुरुष भेदाची मीमांसा जशी फक्त वर्गभेदाच्या कसोटीवर करता येत नाही, तशीच वर्ण-वंशद्वेषाची चिकित्सा फक्त वर्गभेदाने करता येत नाही, म्हणून हे शोषण वर्ग-जात या शोषणपद्धतीजवळ जाते.

या लेखाचा उद्देश अशा 'दलित' समूहांची जगभरची फक्त जंत्री देणे हा नाही. दोन उद्देश आहेत. एक तर जात-वर्ग या रूढ विश्लेषणाखेरीज या शोषणाचा अभ्यास व्हावा. जात-वर्ग या सामाजिक संकल्पना आहेत. म्हणजे, मानवी समाज 'समाज' म्हणून अस्तित्वात आल्यानंतर या संकल्पना जन्माला आल्या. पण प्रागैतिहासिक विश्लेषणशक्यता अशी की माणसाची पशु-अवस्थेपासून तग धरून राहिलेली हिंसक वृत्ती 'संस्कृती'ने दाबली आहे. ती जात-वर्ग-वर्ण-वंश या नावाखाली उफाळून येते. दुसरा उद्देश म्हणजे, आपल्याकडच्या दलित चळवळीला जागतिक भान असणे मला आवश्यक वाटते. त्याआधी हे स्पष्ट केले पाहिजे की या विवेचनाचा उद्देश असे म्हणण्याचा नक्कीच नाही की, 'जगात सगळीकडेच असे चालते, तेच भारतातही चालते.' विषमता आणि शोषण कोठेही आणि कधीही असमर्थनीयच असते आणि त्याविरुद्ध आवाज उठायलाच पाहिजे. पण आपल्याकडे इतर ठिकाणच्या समूहांनी हा आवाज कसा उठवला आहे, याची जाणीव कमी दिसते. 'जगातल्या सगळ्या कष्टकऱ्यांनी एकत्र येण्याची' हाक त्या स्वरूपात आता कालबाह्य झाली कारण 'कामगार' कोण ही व्याख्याच मार्क्सच्या काळापासून बदलली आहे. पण जगातल्या शोषितांनी निदान एकमेकांशी संवाद साधण्याची निकड तितकीच वाढली आहे. जागतिकीकरणाचा एक पैलू काय? तर आंतरराष्ट्रीय भांडवलाचा भौगोलिक विस्तार अतिशय वेगाने वाढला. त्याला प्रत्युत्तर म्हणून शोषितांच्या संघटनांचा विस्तार वाढला असे दिसत नाही. अधिक संघटना जन्माला आल्या असतील पण त्यांचे लक्ष्य स्थानिक अत्याचारांपुरते मर्यादित राहिलेले दिसते. हा संख्यात्मक विस्तार आहे, गुणात्मक नाही. त्यामुळे चित्र काय निर्माण होते? तर एका बाजूला भांडवल अधिक सामर्थ्याने आणि अधिक वेगाने एकवटत आहे तर दुसऱ्या बाजूला असंतोषाचे फुटकळ उद्रेक वाढत आहेत. त्यात भर म्हणून निरनिराळ्या देशात राज्यसंस्था निरनिराळ्या प्रकारे शोषितांवरील विरोधाचे दमन करत आहेत. त्याचाही अभ्यास भारतीय दलित चळवळीने करायला हवा.

प्रथम विकसित पाश्चात्त्य लोकशाही देश (जेथे मी राहतो) पाहू. या देशात बाजार आणि प्रसारमाध्यमे सरकारी धोरण मोठ्या प्रमाणावर ठरवतात. त्यांना शोषितांची ग्राहक म्हणून जरूरीच नसते. उदाहरणार्थ, छत्तीसगढमधला ग्रामीण भूमिहीन शेतमजूर मॅक्डोनाल्डचा बर्गर कधीही विकत घेणार नाही हे उघड आहे. मग मॅक्डोनाल्डच्या भारतीय नकाशावर छत्तीसगढचा ग्रामीण भाग येणारच नाही. पण ही मॅक्डोनाल्ड कंपनी ज्या पाश्चात्त्य देशात आहे त्या देशाचे आणि छत्तीसगढच्या सरकारचे व्यापारी धोरण आपल्याला अनुकूल असे बदलू शकते किंवा या भूमिहीन शेतमजूरावर हल्ला झाला, तर प्रसारमाध्यमांनाही त्यात रस नसतो. पाश्चात्त्य प्रसारमाध्यमांच्या मालकांच्या मते तिसऱ्या जगात अशा घटना रोजच घडतात.

सध्याच्या आर्थिक मंदीमुळे विकसित देशात अचानक बेकारी वाढू लागली आहे. मग सरकारचा पहिला प्राधान्यक्रम 'आपल्या' लोकांचे हितसंबंध राखण्याचा असतो. 'आपल्या' लोकांत अर्थातच पारंपारिक बहिष्कृत येत नाहीत. मग असे समूह दुहेरी शोषणाचे बळी होतात. एकतर बहुसंख्यांकांप्रमाणे त्यांच्या नोकऱ्यांवरही गदा येते. दुसरे म्हणजे 'यांच्यामुळे' आमची अर्थव्यवस्था खालावते आहे असा बहुसंख्यांकांना भ्रम होतो किंवा असा भ्रम उजव्या, वर्णद्वेष्ट्या शक्ती हेतुपुरस्सर करून देतात. मग या समूहांविरुद्धचा आकस, वैरभाव वाढतो, प्रसंगी हिंसाचारही होतो. या प्रक्रियेला सुरूवात झालीच आहे. ही आहे विकसित लोकशाही पश्चिमेतील सद्य:स्थिती.

मध्यपूर्वेतील अनेक मुस्लिम देशांत किंवा चीन-रशियासारख्या एकतंत्रीय देशात मुळात लोकशाहीच नाही त्यामुळे अनिर्वाचित सरकार ठरवेल तेच देशहित, तेच समाजहित आणि तेच राष्ट्रीय धोरण राहते. चीनमधल्या बहुसंख्याकांमधील काहींची किंवा

तिथल्या अल्पसंख्य मुस्लिमांची गळचेपी जगाला अधून-मधून कळली तर कळते कारण प्रसारमाध्यमांवरही शासकीय नियंत्रण असते. मध्यपूर्वेतील ख्रिश्चन अल्पसंख्यांकांवर, बहुसंख्यांकांपेक्षा निराळा पंथ मानणाऱ्या मुस्लिमांवरही अत्याचार होतात. इराकसारख्या युद्धग्रस्त देशांतून गेल्या पाच-सात वर्षांत गरीब, ख्रिश्चन देशोधडीला लागले आहेत. मुस्लिम मूलतत्त्ववाद्यांचा प्रभाव वाढत असल्याने इजिप्तसारख्या त्या मानाने मवाळ देशातही ख्रिश्चनांवरचे अत्याचार वाढत आहेत. तेथे अल्पसंख्य ख्रिश्चनांवरचे अत्याचार वाढत आहेत. पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात अल्पसंख्य ख्रिश्चनांनी आजही फक्त भंगी म्हणून काम करणे अपेक्षित असते.

या जागतिक नकाशावर नजर टाकली तर असे लक्षात येईल की शोषित अल्पसंख्यांक बहुधा तीन-चार प्रकारांत मोडतात.

पहिला प्रकार म्हणजे एखाद्या देशातील आदिम जमाती. परकीय आक्रमणानंतर या जमातींचे उत्पादनाच्या साधनांवरील स्वामित्व गेले. त्यांच्या कसायच्या जमिनी, खाणी, नद्या परकीयांनी बळकावल्या आणि त्यांना त्यांच्याच देशात विपन्नावस्थेत आणले. आपल्याकडे आर्यांच्या आगमनावर पुष्कळ चर्चा झाली आहे, होतही असते. त्यामुळे त्याचे वर्णन करण्याची जरूरी नाही. पण उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया या खंडांतही अलिकडच्या इतिहासात हाच प्रकार झाला. अमेरिकेतील रेड इंडियन्सच्या अनेक स्वायत्त, निसर्गसंलग्न जमातींना बेघर करण्यात आले आणि नापीक भूभागात हद्दपार करण्यात आले. तेच ऑस्ट्रेलियातील आदिवासींबाबत झाले. दोन्हीकडे कित्येक जमाती नामशेष झाल्या. त्यांच्या भाषा, संस्कृती इतिहासजमा करण्यात आल्या. दक्षिण अमेरिकेत तर आजही गोरे व आदिम जमाती यांच्यात नैसर्गिक संपत्तीवरून संघर्ष चालू आहेत.

शोषितांचा दुसरा प्रकार म्हणजे इतर देशांतून बळजबरीने गुलाम म्हणून आणलेल्या लोकांचे आजचे वंशज. लष्करी बळावर दुबळ्या प्रदेशातून गुलामांची आयात प्राचीन काळापासून जगभर चालू आहे. या गुलामगिरीला तत्कालीन धर्मव्यवस्थेने आणि तत्त्वज्ञांनी पाठिंबा दिलेला आहे. इसवी सनापूर्वीच्या ग्रीक आणि रोमन साम्राज्यात २५ ते ३० टक्के लोकसंख्या गुलामांची होती. ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्वज्ञानाच्या मते 'काही माणसे नैसर्गिकरीत्याच गुलाम असतात!' हे विधान जातिव्यवस्थेचे समर्थन करण्यासारखे आहे! इसवी सनाच्या पहिल्या सहस्रकात आजच्या स्वीडन-नॉर्वे या अतिउत्तर युरोपातून नोर्स वंशाच्या लोकांनी युरोपभर धाडी घातल्या, वसाहती वसवल्या. त्यांनी आजचे ब्रिटिश, आयरिश, फ्रेंच, जर्मन, लॅटिन, बाल्टिक वगैरे वंशाच्या लोकांना गुलाम केले. हे गुलाम आपल्या देशांत तरी नेले किंवा आशिया, मध्यपूर्वेच्या गुलामांच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये अरब, रशियन व्यापाऱ्यांना विकले. नोर्स लोकांनी आजचा आइसलँड देश वसाहत केला, त्याच्या निर्मितीत आयरिश गुलामांचा मोठा हातभार होता. पंधराव्या शतकात स्पेनने दक्षिण अमेरिका खंडात आणि पोर्तुगालने पूर्व आफ्रिकेत शिरकाव केला. तेव्हा त्यावेळच्या पोपने, म्हणजे ख्रिश्चनांच्या सर्वोच्च धर्मगुरूने, गुलामांच्या व्यापाराला विशेष मान्यता दिली. ज्यांचा ख्रिश्चनधर्मावर विश्वास नाही, अशा अश्रद्ध लोकांना गुलाम करण्यास हरकत नाही. आज मुस्लिम मूलतत्त्ववादी हेच धोरण अवलंबताना दिसतात. मध्ययुगात जेथे मुसलमान प्रबळ होते, विशेषत: अरब, तेथे त्यांनी जवळच्या देशातील ख्रिश्चनांना गुलाम केले. जेथे ख्रिश्चन समर्थ होते, तेथे त्यांनी मुसलमानांना गुलाम केले आणि आफ्रिकेतील स्वत:चे निराळे धर्म असणाऱ्या लोकांना दोघांनीही गुलाम केले.

आजच्या काळातले उदाहरण म्हणजे अमेरिकेतील (यू.एस.ए.) कृष्णवर्णीय. त्यांना आजही स्वत:ची जमीन नाही, शिक्षण-राहणीमानदृष्ट्या त्यांना मागासलेले ठेवण्यात आले आहे. पण अमेरिकेतील दरिद्री गोरे आणि या समूहाची राजकीय हातमिळवणी होताना दिसत नाही. यावरून वंशभेदाची तीव्रता लक्षात यावी. म्हणजे, अमेरिकेत रेड इंडियन्स आणि कृष्णवर्णीय हे दोन समूह बहिष्कृत जीवन आजही जगत आहेत. मागच्या शतकाच्या उत्तरार्धापासून त्यात आणखी एका समूहाची भर पडत आहे. तो म्हणजे लॅटिन अमेरिकन. दक्षिण अमेरिका खंडाला लॅटिन अमेरिका म्हटले जाते. ब्राझील, अर्जेंटिना, मेक्सिको, बोलिव्हिया वगैरे देश यात येतात. हे लोक मजूर म्हणून या खंडातील अनेक देशांतून, पण विशेषत: मेक्सिको या यू.एस.ए.च्या दक्षिणेला लागून असलेल्या देशांतून येतात. अमेरिकेची (आजवरची) संपन्नता चालू ठेवण्यात त्या समाजासाठी शारीरिक काबाडकष्ट करणाऱ्या या घटकाचा मोठा वाटा आहे. रस्ते साफ करणे, दुकानात अवजड सामान उचलणे, घरांमध्ये मोलकरणी म्हणून काम करणे अशी 'हलकी' कामे अमेरिकन करत नाहीत, ती कामे हे लोक करतात. कायद्याने द्यायच्या किमान वेतनाहून कमी वेतनावर मजबुरीने ते नोकऱ्या करतात. यातील बरेचसे बेकायदेशीर स्थलांतरित असल्याने त्यांना कायद्याचे संरक्षणही नसते आणि जे अगदी कायदेशीररीत्या अमेरिकेत आले त्यांनाही मतदानासारखे मूलभूत अमेरिकन नागरी हक्क नसतात.

पूर्व युरोपच्या साम्यवादाच्या अस्तानंतर तेथून मोठ्या प्रमाणात मजूर अधिक संपन्न पश्चिम युरोपात म्हणजे ब्रिटन, जर्मनी, फ्रान्समध्ये येऊ लागले, त्यांच्याबाबतही हीच सापत्नभावाची वागणूक आढळते. आखाती देशातील भारतीय मजूर हाच अनुभव घेतात. मेक्सिकन, पूर्व युरोपियन किंवा हे भारतीय हे आजचे गुलाम आहेत. फ्रान्स, इटलीमध्ये उत्तर आफ्रिकेतून असेच 'गुलाम' येतात.

शोषितांचे आणखी निराळ्या प्रकारचे उदाहरण म्हणजे कुर्द आणि अर्मेनियन वंशाचे मध्य आशियातील लोक. कुर्द लोकांची एकूण संख्या सुमारे तीन कोटी असावी. स्वत:चे राष्ट्र नसणारा जगातला हा सगळा मोठा वांशिक समूह आहे. तुर्कस्तान-सीरिया-इराण-इराक या चार देशांतील संलग्न प्रदेशात ते विखुरलेले आहेत.

या प्रत्येक देशाच्या लोकसंख्येच्या सुमारे सात ते वीस टक्के कुर्द आहेत. म्हणजे प्रत्येक देशांत ते अल्पसंख्यांक आहेत. त्यांची स्वतंत्र राष्ट्राची गेली कित्येक वर्षाची मागणी आहे. ती कोणीच गंभीरपणे तर घेत नाहीच पण या मागणीने डोके वर काढताच त्या-त्या देशांतील त्यांच्यावरची दडपशाही वाढते. अमेरिकेच्या पहिल्या इराक युद्धानंतर (१९९०-९१) उत्तर इराकचा भाग, जेथे कुर्द बहुसंख्य आहेत, तो भाग त्यांचा स्वायत्त प्रांत करण्यात आला. पण त्यांना मिळालेली ही जास्तीत जास्त सवलत. विशेष म्हणजे, कुर्दही मुस्लिम आहेत आणि ज्या चार देशांत ते प्रामुख्याने आहेत, ते देशही मुस्लिम आहेत. पण ते स्वत:ला कुर्द वंशाचे समजतात. तुर्कस्तानमध्ये तुर्क बहुसंख्यांक आहेत. सीरिया आणि इराकमध्ये अरब बहुसंख्यांक आहेत आणि इराणमध्ये पर्शियन वंशाचे मुस्लिम बहुसंख्यांक आहेत. या देशात कुर्द लोकांकडे हीनतेने पाहिले जाते. त्यामुळे अमेरिकेच्या दडपणाने इराकला त्यांना स्वायत्तता द्यावी लागली तशी स्वायत्तता द्यायला इतर तीन राष्ट्रांची तयारी नाही, मग स्वतंत्र राष्ट्र दूरच.

अर्मेनियन हा मध्य आशियातला दुसरा असाच समूह. रशियाच्या विघटनानंतर अर्मेनिया हा त्यांचा स्वत:चा देश जन्माला आला, पण आजचा रशिया, जॉर्जिया, इराण, सीरिया, तुर्कस्तान या देशांतही बरेच अर्मेनियन आहेत. जगातील एकूण अर्मेनियनांची संख्या ८० लाख असावी. त्यातील ३२ लाख अर्मेनियात आहेत. म्हणजे, त्यांच्या स्वत:च्या देशांत आहेत. तुर्क लोकांचे ओटोमान साम्राज्य होते. या साम्राज्याने १८९५ पासून १९१६ पर्यंत, म्हणजे पहिल्या जागतिक युद्धापर्यंत सुमारे १५ लाख अर्मेनियन अनन्वित अत्याचार करून ठार मारले. जगाच्या इतिहासातील हे एक मोठे हत्याकांड आहे. पण आजतागायत तुर्कस्तान हा वंशच्छेद केल्याचे स्वीकारत नाही. त्यात अर्मेनियन प्रामुख्याने ख्रिश्चन असल्याने इराण, सीरिया, तुर्कस्तानसारख्या मुस्लिम देशांत त्यांचा छळ होतोच.

सध्या जगातला सगळ्यात दलित वर्ग म्हणजे सुदान या आफ्रिकन देशांतील दारफ्यूर या भागातील रहिवासी. सुदानमध्ये प्रामुख्याने अरब आणि अरब नसलेले 'काळे' असे दोन प्रमुख वंश आहेत. पाण्याच्या शोधात या दोन गटांत २००३ पासून वैमनस्य सुरू झाले. सुदानची राजवट आणि राजवटीचे भाडोत्री अरब सैन्य - त्यांना झांझावीड म्हणतात - यांनी 'काळ्यां'च्या प्रदेशावर हल्ले सुरू केले. आजवर या युद्धात - खरे तर एकतर्फी आक्रमणात - ३ लाखांवर मूळ रहिवासी ठार मारण्यात आले आहेत आणि जवळजवळ २५ लाख निर्वासित झाले आहेत. स्त्रियांवरील अत्याचार हा या कत्तलींचा विशेष निर्घृण पैलू आहे. स्त्रियांवर फक्त सामूहिक बलात्कार करून झांझावीड थांबत नाहीत, तर या स्त्रियांचे पाय तोडण्यासारखे क्रूर प्रकारही केले जातात. त्यायोगे तिच्यावर बलात्कार झाला होता हे उर्वरित समूहाला कळते, आणि तिला वाळीत टाकण्यात येते. हे या युद्धातील एक शस्त्र आहे. संयुक्त राष्ट्र संघानुसार जगातले हे सध्याचे सगळ्यात भयानक हत्याकांड आहे. मानवतेविरुद्धच्या या अपराधाबद्दल आंतरराष्ट्रीय कोर्टाने सुदानच्या अध्यक्षाला नुकतेच दोषी ठरवले. पण या निर्णयाचा विपरित परिणाम युद्धाची तीव्रता वाढण्यात होत आहे.

जाता जाता उल्लेख करण्यासारखा दलितांचा आणखी एक प्रकार म्हणजे निर्वासित. निरनिराळ्या युद्धांमुळे, अंतर्गत यादवीमुळे, दुष्काळ, पूर अशा नैसर्गिक आपत्तींमुळे कित्येक लाख लोक देशांतर्गत किंवा देशाबाहेर निर्वासित म्हणून जातात. म्हणजे, आपला पारंपारिक राहता प्रदेश सोडणे त्यांना भाग पडते. जगात कोणत्याही क्षणी किमान चार कोटी लोक निर्वासित किंवा असे विस्थापित असतात. ते जेथे जातात, तेथे समाजाच्या परिघावरच राहतात. अनेक आफ्रिकन देशात हुकूमशाही असल्याने राजकीय विरोधकांना जीविताची हमी नसते. युरोपियन कायद्यानुसार अशा लोकांना, ते आल्यास युरोपमध्ये आश्रय देणे अपेक्षित असते. असे लोक मोठ्या संख्येने आल्यास त्यांना चाळी बांधून स्वतंत्रपणे वसवले जाते. स्थानिक लोकांना या पाहुण्यांना दिलेली ही विशेष वागणूक आवडत नाही. सरकार यांना आमच्या कराच्या पैशाने पोसते आहे अशी स्थानिकांची भावना असते. अतिउजवे गट ही भावना भडकवतात. ब्रिटनमध्ये अशा निर्वासितांचे खूनही झालेले आहेत. एकतर हे लोक शिक्षित असले तरी गावगाड्याबाहेर ठेवले जातात, त्यांना सुरक्षेची, उपजीविकेची हमी नसते व अनिश्चित अधांतरी जीवन जगावे लागते.

याखेरीज ब्रिटनमध्ये बांगलादेशी व पाकिस्तानी, फ्रान्समध्ये अल्जीरिअन व मोरक्कन, जर्मनीमध्ये तुर्क हे स्थलांतरित गुलाम-सदृश्य जीवन जगत असतात. जगभराच्या शोषित-अल्पसंख्यांक-दलितांच्या या धावत्या चित्रणानंतर परत विकसित लोकशाही पश्चिमेतील आजच्या उजव्या शक्तींच्या उदयाकडे वळू कारण या शक्ती दलितांना 'दलित' ठेवतात.

सध्याच्या आर्थिक मंदीचा फटका विकसित देशांना चांगलाच बसला आहे. वर म्हटल्याप्रमाणे आधीच परकीयांविरुद्ध या मंदीमुळे असंतोष वाढण्यास सुरूवात झाली आहे. त्यात, विशेषत: ब्रिटनमध्ये तीनही प्रमुख राजकीय पक्षात खासदार कसा भ्रष्टाचार करतात हे गेले महिनाभर (मे, जून) जाहीर होत आहे. आर्थिक मंदीमुळे बेकारी वाढते आहे. 'आपल्या' लोकांना दिलासा देण्यासाठी ब्रिटनचे पंतप्रधान गॉर्डन ब्राऊन यांनी 'ब्रिटिश नोकऱ्या ब्रिटिश लोकांसाठी' असे जाहीर केले. अशा उद्‌गारांमुळे गोऱ्यांना श्रेष्ठ वंशाचे मानणाऱ्या अतिउजव्या पक्षांना कोलीतच मिळाले. जूनच्या पहिल्या आठवड्यात युरोपियन संसदेच्या निवडणुका झाल्या. ब्रिटनसारखेच वातावरण उर्वरित युरोपात असल्याने 'युरोप फक्त गोऱ्या ख्रिश्चनांसाठी' असा प्रचार करणाऱ्या गुंड पक्षांना आजवर मिळाली त्याहून जास्त मते मिळाली. एकूण संसदीय विचार करता त्यांना दहा टक्केहूनही अधिक जागा मिळालेल्या ❑

नाहीत पण आपल्याकडच्या 'सेना'सारखे उपद्रव्य मूल्य वाढले आहे. हे पक्ष ब्रिटन, फ्रान्स, डेन्मार्कमध्ये बराच आवाज करतात. 'महाराष्ट्रातून बिहारींना हाकला' अशा प्रकारचे हे नारे असतात.

या निवडणुकांच्या जरा आधी ऑस्ट्रेलियात भारतीय विद्यार्थ्यांवर हल्ले झाले. काही तर प्राणघातकी होते. या वर्ण-वंशद्वेषाच्या संदर्भात एक टिपण मी इंटरनेटवर जागतिक चर्चेसाठी ठेवले. हे टिपण आणि त्यावरच्या प्रतिक्रिया खाली देत आहे. लेखाच्या सुरूवातीस उल्लेख केलेला मुद्दा या चर्चेवरून लक्षात यावा. जात-वर्ण-वर्ग या संकल्पना 'माणूस' म्हणून समाजाचा घटक झाला, त्यानंतर अस्तित्वात आल्या. पण जात किंवा वर्ग किंवा वंश यावर आधारित द्वेष व हिंसा ही त्याहूनही आधीची पाशवी वृत्ती असावी.

माझे टिपण पुढीलप्रमाणे -

''वर्ण-वंशद्वेष्ट्या राष्ट्रांच्या क्लबमध्ये आता ऑस्ट्रेलियाचे स्वागत असो. गेल्या काही दिवसांत ऑस्ट्रेलियातील मेलबर्न, सिडनी वगैरे शहरांत भारतीय विद्यार्थ्यांवर हल्ले झाले. खिडक्या फोडण्यात आल्या, सामानाची नासधूस झाली.

ऑस्ट्रेलियातील भारतीय वकील, भारतातील ऑस्ट्रेलियन वकील आणि ऑस्ट्रेलियाच्या उपपंतप्रधान बाई यांनी या घटना चोरीच्या, गुंडगिरीच्या आहेत, वंशद्वेषाच्या नाहीत असा निर्वाळा दिला. पोलिसांनीही हीच भूमिका घेतली. ते स्वाभाविक आहे कारण 'शिक्षण' हा ऑस्ट्रेलियाचा परकीय चलन मिळवण्याचा तिसऱ्या क्रमांकाचा उद्योग आहे. या पैशाला धक्का लागणे सरकारला परवडण्यासारखे नाही.

इथे युरोपमध्ये हिटलरचे वंशज असणारे वर्णद्वेषी पक्ष आहेत. त्यांना आगामी युरोपियन संसदीय निवडणुकांत जास्त मते मिळण्याची अपेक्षा आहे. इतिहास काय सांगतो? या देशांना - ब्रिटन, फ्रान्स, स्पेन, इटली, पोर्तुगाल वगैरे देशांना - 'आमच्यावर राज्य करा' असे काही निमंत्रण उर्वरित जगाने दिले नव्हते. पण दोन शतके या देशांनी वसाहती वसवल्या आणि त्या देशांना लुबाडले. त्यांच्या संपत्तीवर आपले देश समृद्ध केले. आज त्या देशांतून आर्थिक स्थलांतरित या देशांना आवडत नाहीत. शिवाय, जेथे हे आक्रमक स्थायिक झाले, त्या ऑस्ट्रेलियात, अमेरिकेत त्यांनी हीच 'संस्कृती' नेली आणि तेथील मूळ रहिवाशांना नेस्तनाबूत केले.

पण अतिउजव्या शक्ती इतिहास मानतच नाहीत. दुर्दैवाची बाब ही, की या शक्ती इतिहास परत त्याच हिंसक प्रकारे लिहितात.

माझ्या मते या वर्ण-वंश द्वेषामागे फक्त आर्थिक कारणे नाहीत. 'माझी भूमी', 'माझ्यासारखा दिसणारा प्राणी' या अंत:प्रेरणा (instincts) अजूनही शाबूत आहेत. ही प्रेरणा 'सुसंस्कृत समाज', 'लोकशाही' अशी आवरणे कधीही फाडू शकते. कोणताही धर्म, कोणताही आदर्शवाद या हिंसक प्रेरणेला आळा घालू शकलेला नाही.

या टिपणावर अमेरिका (यू.एस.ए.) आणि युरोपमधून आलेल्या प्रातिनिधिक प्रतिक्रिया खालीलप्रमाणे -

अमेरिकेतून मायकेल नावाच्या माणसाने लिहिले - 'आमच्या इथे मेक्सिकन हे आता नवे द्वेषलक्ष्य झाले आहेत. ओबामा राष्ट्राध्यक्ष झाल्याने काळ्यांची जागा त्यांनी घेतली आहे. पण ही तात्पुरती अवस्था आहे. आपण काळ्यांकडे 'दुर्लक्ष' करतो आहोत हे लक्षात येताच गोरे त्यांच्याकडेही परत मोर्चा वळवतील. मला आश्चर्य वाटते, ते या गोष्टीचे, श्रीमंत गोरे गरीब गोऱ्यांना आपल्यापासून कायमच दूर ठेवतात. पण गरीब गोऱ्यांच्या हे का लक्षात येत नाही की मेक्सिकनांचा आणि कृष्णवर्णीयांचा संघर्ष वर्णसंघर्ष नाही, तर वर्गसंघर्ष आहे...

फे नावाच्या ऑस्ट्रियन (युरोपियन) युवतीने खालील प्रतिक्रिया दिली -

'आमच्याकडे पश्चिम फक्त ख्रिश्चनांसाठी' या जाहीरनाम्यावर लढणारा पक्ष युरोपियन संसदेत जास्त जागा मिळवेल असे दिसते. ते ज्यू द्वेष्टेही आहेत आणि मुस्लिम द्वेष्टेही आहेत... ही प्रवृत्तीच भयानक आहे.

ॲडम नावाच्या दुसऱ्या एका अमेरिकनाची प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे -

'वर्णद्वेष माणसात इतका भिनला आहे, की दुसरी जमात मिटवूनच वर्णभेद मिटवता येतो, असे माणसाला वाटते का? यावर माझे उत्तर खालीलप्रमाणे -

'माझ्या मते या प्रश्नाकडे सामाजिक अंगाने पाहण्याबरोबरच जीवशास्त्रीय दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. येथे मानसशास्त्र किंवा पुरातत्त्वशास्त्राचाही उपयोग नाही. वर वर पाहता कातडीचा रंग, मग संस्कृती वर्ण-वंशानुसार वेगळ्या असतात.

पण प्राणी - विशेषत: पक्षी - भिन्न प्रकारचा पक्षी आपल्यात सहन करू शकत नाहीत. ते अशा दुसऱ्या प्रकारच्या पक्ष्याला पळवून तरी लावतात नाहीतर टोचून टोचून ठार तरी मारतात.

माणूस तेच करतो. सांस्कृतिक घटक या जीवशास्त्रीय भेदाला फक्त खतपाणी घालतो. यांना येऊ दिले, तर आपले अस्तित्व धोक्यात येईल ही भीती इतकी खोलवर रूजली आहे, की वर्ण-वंश-वर्ग हा फक्त या हिंसाचाराला दिलेला मुलामा आहे. त्याबरोबरच समाजाला सीमांकित करणारी राष्ट्र ही भौगोलिक व सामाजिक संकल्पना या द्वेषाला तितकीच जबाबदार आहे.

चन्द्रशेखर पुरन्दरे
Email - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com

❐